दैनिक **लोकरक्षणाय** www.lokrakshanay.com
ठाणे, शनिवार, २३ मार्च २०२४

//सुविचार चलबिचल करणाऱ्या शेळीपेक्षा शांत राहणारा वाघ केव्हाही चांगला असतो. //



## नूडल्स किंवा चाऊमिन हे तुमच्या आरोग्यासाठी घातक



**सकाळ** असो वा संध्याकाळ किंवा मग दुपारचे जेवण असो वा रात्रीचे जेवण नूडल्स हा लहान किंवा मोठी असो यापैकी बऱ्याच लोकांचा आवडता मेन्यू असतो. पण तज्ज्ञांच्या मते, नूडल्स किंवा चाऊमिन हे तुमच्या आरोग्यासाठी घातक असते.

खरे तर प्रक्रिया केलेले नूडल्स हे अन्न असते. कमी फायबर आणि प्रथिने त्यात असली तरी त्याला हेल्दी फूड म्हणता येत नाही कारण नूडल्स सतत खाल्ल्याने तुमचे वजन वाढण्याचा धोका असतो.

जर आपण एका आठवड्यात २-३ किंवा त्याहून जास्त वेळा नूडल्स खात असू तर त्याचा परिणाम आपल्या पचनशक्तीवर होतो, असे संशोधनातून दिसून आले.

आपल्या शरीराला चाऊमिन किंवा नूडल्समध्ये वापरले जाणारे फ्लेवर हे सर्वाधिक घातक असतात. हे फ्लेवर अनेक प्रक्रिया करून बनवले जातात. तसेच ते टिकून रहावेत यासाठी त्यावर आणखी प्रक्रिया केली जाते. ज्यामुळे तुमचे वजन वाढते.

फॅटी ॲसिडचे प्रमाण नूडल्समध्ये खूप असते. तसेच नूडल्स बनवताना त्यात हलक्या दर्जाचे तेल, शुगर सिरप, स्वादासाठी वापरले जाणारे पदार्थ आणि असे इतर अनेक पदार्थ असतात. जे शरीरासाठी घातक असतात. तसेच त्यात असलेले monosodium glutamate तुमच्या शरीरावर परिणाम करते. यामुळे रक्तदाब, डोकेदुखी, श्वसनाचे आजार, स्थूलत्व यासारखे आजार होतात. अधिक प्रमाणात लहान मुलांनी चाऊमिन आणि नूडल्स खाल्ल्याने इतर पदार्थांमधील पोषक तत्त्वांचा वापर करण्याची क्षमता कमी होते. ज्यामुळे त्यांना कुपोषणाचा आजार होऊ शकतो.

**मोनोक्रोमॅटिक लूक स्टायलिश आणि सुपर ट्रेंडी लूकसाठी सर्वोत्तम पर्याय आहे. मोनोक्रोम ही एक रंगसंगती आहे, जी बदलत्या मोसमावर आधारित नसते, तर ती रंगावर अवलंबून असते. या सीझनमध्ये क्लासिक ब्लॅक अँड व्हाईट लूकला एका वेगळ्याच पातळीवर घेऊन जाता येईल. काळ्या-पांढऱ्या रंगाचे ठिपके आणि चेकबोर्ड्स किंवा पट्टे मॉडर्न लूक देतात. या रंगाची रंगसंगती सहज आणि आकर्षक असल्याने ती कोणत्याही रंगाच्या व्यक्तीसाठी उठून दिसते.**

## मोनोक्रोम ड्रेस कसे परिधान करावे ?



▮ **पांढऱ्या आणि काळ्या मोनोक्रोमच्या पलीकडे :** पूर्ण काळे किंवा पांढऱ्या रंगांचे कपडे परिधान करणे सर्वात सोपे आहे आणि ते राखाडी रंगासोबत सुद्धा परिधान करू शकतो. क्रोनिकल स्टाईल शरीरावर छान दिसण्यासाठी मुख्य शरीराच्या आकारानुसारच त्याची रचना केली जाते.

▮ **रंगांचे मोनोक्रोम :** टोन आऊटफिट्स पाहताच क्षणी खूप छान वाटू शकतात, विशेषतः जर ते भडक रंगाचे असतील तर त्यासोबत ॲक्सेसरीज शोभून दिसेल अशीच असावी. जेव्हा लाल रंग ड्रेसच्या वरच्या भागावर असते तेव्हा तेव्हा त्यासोबत तुम्ही ब्लॅक किंवा व्हाईट रंगाचे आऊट फिट्सही वापरू शकता. हे ठळक रंग सर्वमान्य आनंददायक आहेत आणि कोणत्याही बूट सोबत सूट होतात.

▮ **सर्वच कॅमल रंग सारखेच नसतात :** काही कॅमल रंग अधिकच पिवळे असतात, तर इतरांना राखाडी रंग ही असतात. एखाद्या बॉसप्रमाणे या मोनोक्रोम ट्रेंडला तुम्ही वापरू शकता, ऑफ ब्राऊन छटा शोधून काढा ज्या तुम्हाला सूट करतील आणि आपल्या इच्छेनुसार हवे ते रंग जुळवून पाहू शकता. मस्टर्ड एक उत्कृष्ट पण अत्यंत अंडररेटेड रंग आहे. डोक्यापासून ते पायापर्यंत तुम्ही मखमली रंगाची शेडसुद्धा वापरू शकता.

▮ **टेक्श्चर (पोत ) :** वस्त्राची वीण (बनावट) ही कोणत्याही मोनोक्रोम लूकचा आत्मा आहे. वेगवेगळ्या कापडा सोबत वेगवेगळे रंग, जसे की डायमेन्शनल वेल्व्हेट्स आणि चमकदार सॅटिन यामध्ये समावेश करता येईल.

▮ **सूट :** मोनोक्रोम लूकमध्ये आणखी ॲट्रॅक्टीव्ह दिसण्यासाठी इच्छुक असल्यास सूट हा दुसरा उत्तम पर्याय आहे. समान रंगाचा एक हलका ब्लाऊज त्यावर आणखी उठून दिसेल. टॉप कॉन्ट्रास्टिंग टेक्श्चरसह जोडलेले असल्यास किंवा सूक्ष्म प्रिंट वापरल्यास ते आणखी चांगले दिसते.

आपले आवडते रंग निवडणे आणि त्यांचा वापर करणे किंवा त्यांच्याबरोबर प्रयोग करणे हे अत्यंत महावाचे आहे. पोत समाविष्ट करणे आणि विशिष्ट आराखड्यात बनवल्या गेलेल्या भिन्न प्रकारांच्या कापडामुळे खोली, माप, विशिष्टता आणि रुची वाढवण्यात मदत होऊ शकते. इथे आणि तिथे सर्वत्र असलेल्या या ट्रेंडसह आपण सहजपणे प्रयोग करू शकता जसे की, लेस, लेदर, फर, पंख, भरतकाम, पॅटर्न्स, सजावट इत्यादी.

**'ज्येष्ठमध' हे एक आयुर्वेदिक औषध आहे. त्याला यष्टीमध असेही म्हटले जाते. संगीत शिकणाऱ्यांसाठी ज्येष्ठमध कंठ सुधारक म्हणून उपयोग करते. गॅस्ट्रिक अल्सर तसेच लहान आतड्यामध्ये होणाऱ्या ड्यूओडनल अल्सरवरही ज्येष्ठमध हे लाभदायी ठरत असते.**

## गुणकारी ज्येष्ठमध



**ज्येष्ठमध** एक वनौषधी असून त्याचे झाड साधारण पाच ते सहा फूट उंचीचे असते. ज्येष्ठमधाच्या काड्या या चवीने गोड असतात. त्याचा उपयोग स्वयंपाकघरातील मसाल्यांमध्येही केला जात असतो. आयुर्वेदात ज्येष्ठमधाचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. अष्टांग हृदय, चरक संहितासारख्या अतिप्राचीन ग्रंथांमध्ये त्याचा उल्लेख आढळतो. शुद्ध हरपणे, पोट दुखी, दमा, स्तनाचे आजार, गुप्त आजार आदी आजारांवर ज्येष्ठमध गुणकारी आहे. परदेशात स्त्रियांच्या सेक्ससंबंधी आजारांवर त्याचा औषध म्हणून उपयोग केला जातो. ओल्या ज्येष्ठमधामध्ये पन्नास टक्के पाणी असते. ते सुकल्यानंतर केवळ दहा टक्के उरते. ज्येष्ठमधात ग्लिसराइजिक ॲसिडचे प्रमाण असल्याने त्याची चव साखरेपेक्षाही गोड असते.

**पोटाचे विकार :** ज्येष्ठमधाचे चूर्ण पोटाच्या विकारांसाठी अत्यंत गुणकारी आहे. पोटात झालेली जखम त्याने लवकर भरून निघते. ज्येष्ठमधाचे एक ग्रॅम चूर्ण पाण्यासोबत नियमित सेवन केल्याने स्तन व योनीसंबंधी आजार दूर होऊन त्यांच्यात सेक्सविषयी भावना जागृत होत असते. तसेच स्त्रियांना आपले सौंदर्य अनंत काळापर्यंत टिकवून ठेवता येत असते.

**अल्सर :** गॅस्ट्रिक अल्सर व लहान आतड्यांना होणाऱ्या ड्यूओडनल अल्सरवर ज्येष्ठमध हे अत्यंत प्रभावी औषध आहे. इतर औषधांच्या तुलनेत ज्येष्ठमध, अल्सर हा आजार लवकर बरा करत असते.

**रक्ताची उलटी :** रक्ताची उलटी झालेल्या रुग्णाला दूध किंवा मधासोबत ज्येष्ठमध दिल्याने त्याला आराम पडतो. तसेच उचकी, सर्दी या आजारावर ज्येष्ठमध चूर्ण अधिक गुणकारी आहे.

## तुळस : अशीही आरोग्यदायी



शरीराला ऑक्सिजनची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असते. हवेमधून आपल्याला कायमच ऑक्सिजन मिळत असतो. तसाच वड, तुळस हेदेखील आपल्याला ऑक्सिजनचा पुरवठा करत असतात. मात्र सध्याच्या काळामध्ये वातावरणात प्रचंड प्रमाणात बदल होत आहेत. प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अनेकांना श्वसनासंबंधीचे आजार, दमा, मायग्रेन, फुफ्फुसाचा संसर्ग, खोकला यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. दिवसेंदिवस याचे प्रमाणदेखील वाढत आहे. त्यामुळे या समस्यांपासून सुटका करून घ्यायची असेल तर काही नैसर्गिक घटकांच्या माध्यमातून आपण यावर मात करू शकतो. या नैसर्गिक घटकांमध्ये तुळस ही अत्यंत उपयुक्त आहे. अंगणात डोलणारी तुळस जितकी मोहक आणि प्रसन्न वाटते त्याप्रमाणेच ती आपले आरोग्य सुधारण्यासाठीही तितकीच महत्त्वाची असते. आयुर्वेदिक आणि निसर्गोपचार औषधांमध्येही तिचा मोठ्या प्रमाणावर वाटा आहे. तुळशीची केवळ पानेच गुणकारी नसून या वनस्पतीची फुलेही तितकीच बहुगुणी आहेत. त्यामुळे पुढील काही आरोग्य समस्यांवर मात करण्यासाठी तुळस वनस्पती हे उत्तम औषध ठरते.

˘ ताप : अनेक वेळा वातावरणात बदल झाला की काहींना लगेच ताप वगैरे सारखे आजार होतात. यावर अनेक उपाय केल्यानंतरही काहींना फरक जाणवत नाही. अशा वेळी दारापुढील तुळस कामी येते. ऑक्सिजन देण्यासोबतच तुळस तापावरही गुणकारी आहे. ताप आल्यानंतर तुळशीच्या पानांचा रस काढावा आणि १-२ चमचे सेवन करावा त्यामुळे ताप उतरण्यास मदत होते.

˘ सर्दी : सर्दी झाल्यानंतर अनेक वेळा नाक चोंदणे, श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या समस्या निर्माण होता. अशावेळी रिकाम्या पोटी तुळशीची पाने चघळल्याने सर्दी दूर होऊ शकते.

˘ डोकेदुखी : अतिउष्णतेने डोकेदुखीची समस्या निर्माण होणे ही सामान्य गोष्ट आहे. अशावेळी तुळशीची पाने आणि चंदनाची पेस्ट करून कपाळावर लावावी. यामुळे नक्कीच डोकेदुखी कमी होण्यास मदत होते.

˘ डोळ्यांची समस्या : डोळ्यांच्या समस्यांवर तुळशीच्या काळ्या पानांचा रस महत्त्वाची भूमिका निभावतो. तुळशीच्या काळ्या पानांच्या (कृष्ण तुळस) रसाचे काही थेंब डोळ्यात टाकल्याने दाहकता कमी होण्यास मदत होते.

˘ दातांची समस्या : तुळशीच्या पानांची पावडर मोहरीच्या तेलात मिसळून पेस्ट तयार करून या पेस्टने दात घासावेत. यामुळे हिरड्या, दात दुखणे यावर तत्काळ उपचार होतो.

˘ कीटक चावणे : डास आणि इतर कीटकांचे चावणे मुख्यतः मान्सूनच्या महिन्यात अशा समस्या वाढतात. अशावेळी ज्या ठिकाणी कीटक चावला आहे तेथे तुळशीच्या मुळांची पेस्ट लावावी.

˘ किडनी स्टोन : किडनी स्टोनच्या समस्येला सामोरे जाणाऱ्यांनी मध आणि तुळशीच्या पानांचे रसमिश्रित मिश्रण प्यावे.

˘ मानसिक तणाव : रोजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक तणाव निर्माण होणे हेही रोजचे झाले आहे. तणाव विरहीत जीवन जगण्यासाठी रोज १० ते १२ तुळशी पाने रोज खावीत. तुळशीची पाने तणावावर मात करणारे शस्त्र म्हणून काम करतात.

## 'या' मराठी वाहिनीवर पहिल्यांदाच होणार रंगपंचमी महासंगम!

सोनी मराठी वाहिनीवर रंगपंचमी महासंगम पहिल्यांदाच होणार आहे. महासंगम म्हणजेच सोनी मराठीवरील सगळ्यांच मालिकांतील प्रेक्षकांना आवडणाऱ्या व्यक्तिरेखा आपल्याला एकत्र पाहायला मिळणार आहेत. सोनी मराठीवर पहिल्यांदाच एवढा मोठा महासंगम पाहायला मिळणार आहे. नेहमी निरनिराळ्या मालिकांतून प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या, प्रेक्षकांना आवडणाऱ्या ह्या व्यक्तिरेखा रंगपंचमीसाठी एकत्र येऊन किती मजा करताहेत, हे आपल्याला येत्या सोमवारी म्हणजेच २५ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता पाहता येणार आहे. अबोल प्रीतीची अजब कहाणी मालिकेतील सराफ परिवाराने सोनी मराठीवरील या सगळ्या व्यक्तिरेखांना आपल्या घरी होळी पार्टीनिमित्त एकत्र बोलावले आहे.

यामिनी सराफ यांनी या सगळ्याचं आयोजन केलं असून राजवीर आणि मयूरी हे या सगळ्या पाहुण्यांचं आदरातिथ्य करणार आहेत. या पार्टीमध्ये ह्यवीरू आणि प्राजक्ता,





मीरा आणि मल्हार, बयो आणि डॉ. विशाल, यशोधन आणि असीम हे सगळे कलाकार एकत्र दिसणार आहेत. या रंगपंचमी पार्टीमधील प्रमुख बाब म्हणजे या कलाकारांचे पेहेराव. सगळ्या जोड्या वेगवेगळ्या रंगांचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

रंगपंचमी म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर निरनिराळे रंग दिसतात. तशाच निरनिराळ्या रांगांमध्ये हे कलाकार आपल्याला दिसतील. शिवाय या महासंगममध्ये या प्रत्येक कलाकाराचे विशेष असे नृत्य सादरीकरण प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. त्याशिवाय मयूरी बॉडीगार्डच्या वेशात पार्टीमध्ये राजवीरसोबत असणार असेल, तर ती या सगळ्यांचं आदरातिथ्य करायला मयूरीच्या वेशात कशी येणार, हे पाहणं फार उत्सुकतेचं असेल. मयूरी हीच बॉडीगार्ड आहे का? त्याशिवाय यामिनी आणि जोजो मिळून मयूरीला त्रास देण्यासाठी काही विशिष्ट प्लॅन करतील का? हे सगळं आपल्याला रंगपंचमी महासंगममध्ये पाहायला मिळणार आहेत.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | | | 6 | 8 | | 7 | |
| | | 9 | | 7 | 2 | | 3 | 6 |
| | | | | 9 | | | 4 | |
| 9 | 5 | | | | 4 | | | 2 |
| | | 2 | 6 | | | | | |
| 7 | | 4 | | | 5 | | | |
| 2 | | | | | 6 | 5 | 9 | |
| 3 | 8 | | | | | | | |
| 4 | | | 1 | 5 | | | | |

### उत्तर सुडोकू -३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 2 | 5 | 7 | 8 | 4 | 6 | 3 |
| 4 | 7 | 3 | 9 | 6 | 1 | 5 | 8 | 2 |
| 6 | 5 | 8 | 2 | 3 | 4 | 1 | 7 | 9 |
| 3 | 1 | 4 | 6 | 8 | 2 | 7 | 9 | 5 |
| 7 | 6 | 5 | 1 | 9 | 3 | 2 | 4 | 8 |
| 2 | 8 | 9 | 7 | 4 | 5 | 3 | 1 | 6 |
| 5 | 2 | 6 | 8 | 1 | 7 | 9 | 3 | 4 |
| 9 | 4 | 7 | 3 | 5 | 6 | 8 | 2 | 1 |
| 8 | 3 | 1 | 4 | 2 | 9 | 6 | 5 | 7 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## अनन्याचा स्टायलिश लूक एकदा पाहाच

बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे चित्रपटाव्यतिरिक्त अनन्या तिच्या खासगी आयुष्यामुळे देखील चर्चेत असते. अनन्या सोशल मीडियावर देखील खूप सक्रिय असते. नुकताच अनन्याने खास लूक केला होता. ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे चित्रपटाव्यतिरिक्त अनन्या तिच्या खासगी आयुष्यामुळे देखील चर्चेत असते. अनन्या सोशल मीडियावर देखील खूप सक्रिय असते. नुकताच अनन्याने खास लूक केला होता. ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. चाहते तिच्या या लूकवर अनेक कमेंट्स करत आहेत.



## दिनविशेष

### २३ मार्च

- १८३९: बोस्टन मॉर्निंग पोस्ट या वृत्तपत्रात ओ. के. या शब्दाचा पहिला छापील उपयोग झाला.
- १८५७: न्यूयॉर्क शहरात पहिली लिफ्ट सुरू करण्यात आली.
- १८६८: कॅलिफोर्निया विद्यापीठाची ओकलंड येथे स्थापना झाली.
- १९१९: बेनिटो मुसोलिनी यांनी मिलान इटली मध्ये हुकूमशाही राजकीय चळवळ सुरूकेली.
- १९३१: भारतीय क्रांतिकारी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली.
- १९४०: संपूर्ण स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीचा ठराव लाहोर येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनात संमत.
- १९५६: पाकिस्तान हे जगातील पहिले इस्लामी प्रजासत्ताक बनले.
- १९८०: ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धा प्रकाश पदुकोन यांनी पहिले भारतीय म्हणून जिंकली.
- १९९८: अभिनेते दिलीपकुमार यांना निशान-ए-इम्तियाज हा पाकिस्तानचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
- १९९९: पं. भीमसेन जोशी व लता मंगेशकर यांना पद्मविभूषण सन्मानाने गौरविण्यात आले.
- १९९९: क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि अभिनेत्री सुलोचना यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला.
- २००१: रशियाचे मिर हे अंतराळस्थानक पृथ्वीवर कोसळले.
- १६९९: अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ जॉन बार्ट्राम यांचा जन्म.
- १७४९: फ्रेंच गणितज्ञ पिएर सिमॉन दि लाप्लास यांचा जन्म.
- १८८१: नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक रॉजर मार्टिन दु गार्ड यांचा जन्म.
- १८८१: नोबेल विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ हेर्मान स्टॉडिंगर यांचा जन्म.
- १८८३: कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै यांचा जन्म. (मृत्यू: ६ सप्टेंबर १९६३)
- १८९३: भारतीय व्यापारी गोपालस्वामी दुराईस्वामी नायडू यांचा जन्म. (मृत्यू: ४ जानेवारी १९७४)

## भविष्य

**मेष** जवळची प्रवासात खबरदारी घ्यावी. मानसिक द्विधावस्था वधू शकते. आवडीची कामे करण्यावर भर द्यावा.

**वृषभ** तुमच्या व्यक्तिमत्वाची छाप पडेल. फॅशनची हौस पूर्ण कराल. धार्मिक कार्यात हिरीरीने भाग घ्याल. वाणीत गोडवा ठेवाल.

**मिथुन** मनातील संभ्रम दूर करावेत. सरकारी कामे वेळ लावू शकतात. वाताचा त्रास जाणवू शकतो. संसर्गजन्य विकारांपासून काळजी घ्यावी.

**कर्क** भावनेच्या भरात वाहून जाऊ नका. जोडीदाराचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न करावा. मानसिक ताण-तणावापासून दूर राहावे. वरिष्ठांची मर्जी संपादन करावी.

**सिंह** मनातील इच्छा पूर्ण होईल. अंगीभूत कलेला प्रोत्साहन मिळेल. औद्योगिक वातावरण चांगले राहील. जोडीदाराशी सल्ला मसलत कराल. बाहेरील अन्नपदार्थ टाळावेत.

**कन्या** जोडीदाराचे उत्पन्न वाढेल. मानसिक संभ्रम दूर करावेत. वेळेचे बंधन पाळवे लागेल. कामातील द्विधावस्था त्रासदायक ठरू शकते. मुलांचे वागणे विरोधी वाटेल.

**तुला** घरगुती परिस्थिती शांतपणे हाताळा. प्रलोभनापासून दूर राहावे. कामात आळस आड येऊ शकतो. इतरांना स्वेच्छेने मदत कराल. संयम बाळगावा लागेल.

**वृश्चिक** साहस करताना सावधानता बाळगावी. योग्य मार्गाचा अवलंब करावा लागेल. भावंडांचे प्रश्न सामोरी येतील. जोडीदाराची मर्जी राखावी लागेल. प्रवासात खबरदारी घ्यावी लागेल.

**धनु** कौटुंबिक प्रश्न शांततेने सोडवावेत. मानसिक दोलायमानता वाढू शकते. स्वतःवरील विश्वास डळमळीत होऊ देऊ नका. कायदेशीर कामात वेळ जाईल. नवीन मित्र जोडाल.

**मकर** प्रतिकूलतेतून मार्ग काढाल. अघळ पघळ गप्पा माराल. नवीन विचारांची कास धरावी लागेल. हातातील अधिकारांचा वापर करावा. चिकाटी सोडून चालणार नाही.

**कुंभ** हजरजबाबीपणे वागाल. सामुदायिक वादांपासून दूर राहावे. धार्मिक यात्रेचे योग येतील. मुलांच्या आनंदात सहभागी व्हाल. उत्तम वाहन सौख्य लाभेल. वडीलधार्यांचा सल्ला घ्यावा. वारसाहक्काची कामे चिघळू शकतात.

**मीन** श्रम काही प्रमाणात वाढू शकतात. कागदपत्रे जपून ठेवावीत. हस्त कलेचे कौतुक केले जाईल. अती श्रमाचा थकवा जाणवेल. योग्य व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. घरगुती कामात वेळ जाईल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# महाविकास आघाडी थंड!

लोकसभा निवडणूक जाहीर होऊन पाच दिवस उलटले. या काळात भाजपने पहिल्या २० उमेदवारांची यादी जाहीर केली. येत्या दोन दिवसात दुसरी यादीही जाहीर होण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचीही यादी येत्या काही दिवसात जाहीर होण्याची चिन्हे दिसत आहेत. महाविकास आघाडीत मात्र अजूनही कोणत्या पक्षाला उमेदवारी द्यायची याचीच खलबते सुरू आहेत. काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी या तीनही पक्षांनी अद्याप एकही उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे इच्छुक मंडळी संभ्रमात आहेत. दुसरीकडे भाजपचे २० उमेदवार मात्र प्रचारात व्यग्रही झाले आहेत. महाविकासची यादी जाहीर होईपर्यंतचा काळ हा भाजपच्या उमेदवारांना प्रचारासाठी बोनस काळ असेल. या काळात त्यांना प्रचारात आघाडी घेता येईल. लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी करून भाजप निवडणुकीला सामोरे जात असल्याचे दिसते, मात्र महाविकास आघाडीची मंडळी परीक्षा जवळ आल्यावर अभ्यासाला लागलेली आहे. वास्तविक गेल्या वर्षभरापासून लोकसभा निवडणुकीची चर्चा सुरू आहे. त्या दृष्टीने सत्ताधारी भाजप आणि अन्य पक्ष रणनीतीही आखत होते. राम मंदिर असो, कलम ३७० रद्द करणे असो वा नागरिकत्वाच्या कायद्यात सुधारणा करणे असो, निवडणुकीला समोर ठेवून भाजप लोकांचे मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत आहे. महाविकास आघाडीकडून मात्र अद्यापही असे कुठलेच प्रयत्न होताना दिसत नाहीत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत जोडो न्याय यात्रा काढली खरी, पण स्थानिक पदाधिकार्यांना या यात्रेचे सोने करता आले नाही. माध्यमांनी दिलेल्या बातम्या वाचून आलेल्या लोकांपलीकडे या यात्रेत फारशी गर्दी दिसली नाही. मुळात अनेक शहरांत स्थानिक पदाधिकार्यांनी यात्रेची वातावरणनिर्मितीच केलेली दिसली नाही. ती केली असती तर निवडणुकीत हा पक्ष किमानपक्षी चर्चेत तरी आला असता. यावरून स्थानिक पदाधिकारी भाजपला फितूर झाले की काय, अशीही शंका येते. केवळ भारत जोडो यात्राच नव्हे तर गेल्या वर्षभरात विरोधी पक्षांनी भाषणे आणि पत्रकार परिषदांशिवाय फार काही केले नाही. वास्तविक महागाई, बेरोजगारी, इलेक्शन बॉण्ड, धनदांडग्यांना कर्जमाफी, एकाधिकारशाही, कांदा निर्यातबंदी, शेतकरीविरोधी धोरणे, जुनी पेन्शन योजना, ईडीचा गैरवापर आदी असंख्य मुद्यांना विरोधकांना कवेत घेता आले असते. या मुद्यांच्या अनुषंगाने सातत्याने आंदोलने करीत, रस्त्यावर उतरत भाजपला सळो की पळो करून सोडता आले असते. यानिमित्ताने विरोधकांचा डंका सर्वसामान्य मतदारांपर्यंत वाजला असता, परंतु पुढे निवडणुकीलाही सामोरे जायचे आहे याची विरोधकांना जणू चिंताच नसल्याचे वातावरण काही वर्षांपासून दिसत आहे. पक्ष फुटणे, नेत्यांवर होर्णाया ईडीच्या कारवाया याशिवायदेखील जनतेचे महत्त्वाचे मुद्दे आहेत याचा विसर विरोधकांना पडला. त्यामुळे ते भाजपच्या विरोधात हवे तसे वातावरण तयार करू शकलेले नाहीत. निवडणुका समोर ठेवून आघाडीतील घटक पक्षांच्या कितीतरी बैठका यापूर्वीच होणे गरजेचे होते. इंडिया आघाडीच्या अशा बैठका झाल्या असल्या तरी महाराष्ट्रात प्रमुख पक्षांच्या संयुक्त बैठका अगदी बोटावर मोजण्याइतक्याच झाल्या. त्यामुळे ऐन निवडणुकीत वंचित आघाडीसारख्या पक्षासोबत बोलाचाली करण्यात महाविकासला वेळ दवडावा लागत आहे. या बोलण्यांना आधीपासूनच सुरुवात झाली असती तर आजवर उमेदवारांची एकतरी यादी जाहीर झाली असती, परंतु आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर विरोधकांना खडबडून जाग आल्याने प्रचारासाठीचा अतिशय महत्त्वाच्या असलेल्या काळात बैठकांचे गुंहाळ चालू आहे. महायुतीत सगळेच आलबेल आहे असे म्हणता येणार नाही, परंतु एकीकडे जागावाटपावरून बैठकांचा सपाटा सुरू असताना दुसरीकडे त्यांनी उमेदर्वायाही जाहीर केल्या आहेत. त्यामुळे ज्यांची नावे जाहीर झाली त्यांना मोकळेपणाने प्रचार तरी करता येत आहे, पण महाविकास आघाडीत दररोज वेगवेगळी नावे पुढे येत असल्याने प्रचार सुरू करावा की नाही, असा प्रश्न इच्छुकांसमोर आहे. बर्याच मतदारसंघांमध्ये तर उमेदवार दूरच कोणत्या पक्षाला हा मतदारसंघ सुटणार आहे हेदेखील निश्चित नाही. त्यामुळे तीनही पक्षांचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत. त्यातच वंचित आघाडी असो वा एमआयएम या पक्षांसोबतही बोलणी फिस्कटत आहेत. अशा परिस्थितीत उमेदवार ऐनवेळी कुठल्या मानसिकतेत निवडणुकीला सामोरे जाणार? महाराष्ट्रात शिवसेना असो वा राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांची फोडतोड सर्वसामान्य नागरिकांना रुचलेली नाही. त्यामुळे कुठलेही कर्तृत्व नसताना उद्धव सेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सहानुभूती मिळत आहे, पण या सहानुभूतीला कॅश करण्याचा काळ महाविकास आघाडी हातचा घालवत आहे. दुसरीकडे चारशे प्लसचा आकडा जाहीर करताना भाजपने निवडणुकीची रणनीती आखली आणि त्यानंतरच ते निवडणुकीला सामोरे गेले. महाविकास आघाडीत मात्र असे नियोजन दिसत नाही. त्यातच तीनही पक्षांच्या नेत्यांमध्ये अजिबातच समन्वय नसल्याने वातावरण भाजप विरोधातील असूनही त्याचा फायदा महाविकास आघाडीला घेता येत नाही असे दिसते. अजूनही वेळ गेलेली नाही. महाविकास आघाडीत सर्वच जागांवरून वाद आहे असेही नाही. असंख्य जागांसाठी महाविकासकडे तुल्यबळ उमेदवार आहेत. या उमेदवारांशिवाय महाविकासकडे दुसरा पर्यायदेखील नाही. त्यामुळे किमानपक्षी अशा दमदार नेत्यांना अधिकृतपणे उमेदवारी देऊन भाजपला घाम फोडता येणे शक्य आहे.

# पुनर्चक्रीकरणातील कचरावेचकांचे 'मूल्य'




**उत्पादकांना** संपूर्ण उत्पादनचक्रासाठी जबाबदार ठरवणाऱ्या धोरणामध्ये अखेर 'कचरा वेचकां'ची भूमिका व महत्त्व ओळखण्यात आले, ही समाधानाची बाब आहे. कचरा वेचकांच्या कामासंदर्भात पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक पैलूंचा विचार केला तर सर्वांनाच त्यांचे महत्त्व लक्षात येईल.पर्यावरण, वन व हवामानबदल मंत्रालयाने प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियमावलीमध्ये नुकताच केलेला बदल स्वागतार्ह आहे. ग्रामपंचायती व नगरपालिकांनी प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनामधील संकलन, वाहतूक, वर्गीकरण, साठवणूक व विल्हेवाट या प्रत्येक टप्प्यावरील कचरावेचकांच्या सहभागाचा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. 'अलायन्स ऑफ इंडियन वेस्टपिकर्स' या भारतातील कचरावेचकांच्या संस्थेने केलेल्या प्रलंबित मागणीची अखेर पूर्तता झाल्यामुळे कचरावेचकांच्या खडतर प्रवासात आशेचा किरण दिसला आहे. सदोष, निरुपयोगी, टाकून दिलेल्या वस्तू व भंगार माल घरांतून, रस्त्यांवरून, कचरापेट्यांमधून, कचऱ्याच्या ढीगांमधून, लँडफिलमधून वेचून व विकून स्वयंरोजगार निर्माण करणारे कष्टकरी म्हणजे कचरावेचक. पुनर्चक्रीकरण (रिसायकलिंग) म्हणजे कचऱ्याच्या मालाचा पुन्हा वापर करून नवीन उत्पादन व वस्तूंमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया. कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा कच्चा माल म्हणून वापर होत असल्याने नव्या मालासाठी खर्च होणारी नैसर्गिक संसाधने, लँडफिलची गरज कमी होऊन, कचरा विल्हेवाटीच्या खर्चाची मोठ्या प्रमाणावर बचत होते.चक्रीकरणाकडे केवळ शास्त्रीय, यांत्रिक किंवा तांत्रिक बाब म्हणून न बघता त्याचे सामाजिक, पर्यावरणीय व आर्थिक पैलूही लक्षात घेणे गरजेचे आहे. समाजाने निरुपयोगी ठरवलेल्या, टाकून दिलेल्या कचऱ्याला 'मूल्य' मिळवून देणारे कष्टकरी हे 'मूल्यवर्धन' या संकल्पनेचे मूळ जनकच आहेत. कचऱ्यातून प्लॅस्टिक, कागद, पत्रा, काच, चप्पल, भंगार, दूध पिशव्या, टायर असे अनेक भंगार माल वेगळे काढून त्याचे प्रकार व गुणवत्तेनुसार वर्गीकरण करून कचरावेचक प्रत्येक भंगार मालाची मूल्यसाखळी तयार करतात. भंगार मालाव्यतिरिक्त, चिंधी, केसांची गुंतवळ व धान्याची भरड अशा कचऱ्यात येणाऱ्या मालास कचरावेचक आपल्या नवउद्यमशीलतेने मूल्य प्राप्त करून देतात. यामुळे नगरपालिकांसाठी कचरा हाताळणी, प्रक्रिया, वाहतूक, इंधन, मानवी संसाधने यांवरील भार कमी होतो. त्यासोबत हरितवायू उत्सर्जनामध्ये लक्षणीय घट होऊन पर्यावरण संवर्धनासदेखील हातभार लागतो.पुनर्चक्रीकरण ही चांगल्या उद्देशाने सुरू केलेली यंत्रणा असली तरी त्याची अंमलबजावणी निराशाजनक ठरते. जागतिकीकरणामुळे उदयास आलेल्या अत्यंत आक्रमक बाजारपेठेमुळे उपभोगवाद वाढला. कचऱ्याचे स्वरूप बदलले. कागद, काच, पत्रा यांसारखे अनेक वेळा पुनर्चक्रीकरण करता येतील असाच कच्चा माल उत्पादनांच्या पॅकेजिंगसाठी वापरणारे उत्पादक प्लॅस्टिक वापरायला लागले. कागद, काच, पत्रा या मालाच्या पुनर्चक्रीकरणाचे प्रमाण प्लॅस्टिक पुनर्चक्रीकरणापेक्षा वरचढ आहे. लवचिक, रंगीबेरंगी, एकाहून अधिक थर असलेल्या प्लॅस्टिकच्या पुनर्चक्रीकरणाचे प्रमाण टिकाऊ, उपयुक्त, अनेक वेळा पुनर्चक्रीकरण करता येण्याजोग्या प्लॅस्टिकच्या तुलनेत खूप कमी आहे. कचरावेचकांच्या उपजीविकेचा विचार केला तर कागद, काच, पत्रा यांच्या तुलनेत टिकाऊ प्लॅस्टिक भंगार मालाला अधिक दर मिळतो आणि त्यामुळे कमाईत वाढ होते. पुण्यातील 'कागद-काच-पत्रा-कष्टकरी पंचायत' या संघटनेद्वारे कचरावेचकांच्या चळवळीतून पुढे आलेल्या 'स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थे'चे कचरावेचक ३५ टक्के सुका कचरा व ३७ टक्के प्लॅस्टिक पुनर्चक्रीकरणासाठी पाठवून दरवर्षी २० कोटी रुपये वाचवतात.परंतु भारतातील व जागतिक पातळीवरील प्लॅस्टिक पुनर्चक्रीकरणाचा दर अनुक्रमे १२ टक्के व पाच टक्के एवढाच आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातून बघितले तर प्लॅस्टिकचे संपूर्ण उत्पादनचक्र हे आरोग्यासाठी घातक आहे हे दिसते. पर्यावरणासाठी भंगार माल पुनर्चक्रीकरणासाठी पाठवणारे कचरावेचक आणि इतर भंगार मालासोबत प्लॅस्टिक माल विकून उपजीविका सांभाळणारे कष्टकरी अशी दोन अंतर्विरोधी व्यक्तित्वे कचरावेचक जगतात. मार्गदर्शक तत्त्वांची गरज भारतातील कचरावेचकांची संख्या तब्बल ५० लाख आहे. 'घनकचरा व्यवस्थापन नियमावली, २०१६' नुसार प्रत्येक राज्याने कचरा कमी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या असंघटित क्षेत्रातील कचरावेचकांची दखल घेऊन त्यांना कचरा व्यवस्थापनप्रणालीत समाविष्ट करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद करणे गरजेचे आहे.पुनर्चक्रीकरणासाठी महत्त्वाचा घटक असणाऱ्या कचरावेचकांच्या कामाला बळ मिळण्यासाठी देशातील सर्व राज्यांनी मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद करून तातडीने अंमलबजावणी करायला हवी. जास्तीत जास्त पुनर्चक्रीकरणासाठी कचरावेचकांची नोंदणी, सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये समावेश व ओळखपत्र, भंगार माल वर्गीकरण व साठवण्यासाठी जागा, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, त्यासाठी योग्य सोयी व सुविधा पुरवणे गरजेचे आहे. भंगार माल विक्रीव्यतिरिक्त त्यांनी दिलेल्या सेवेसाठी योग्य मोबदला मिळाला तरच आपली कचरा व्यवस्थापन व्यवस्था न्याय्य ठरेल. उपजीविकेसाठी कचऱ्यावरचा हक्क राखत काम करणारे कचरावेचक व नफेखोरीतून सुरू असलेल्या कचरा संकलनसेवेचे खासगी कंत्राटीकरण यांमध्ये तुलना केली तर कचरावेचकांची नियमित सेवा कमी खर्चिक ठरते, हे सिद्ध झाले आहे.२०१६ मध्ये आलेल्या प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियमावलीद्वारे एक्स्टेंडेड प्रोड्यूसर रिस्पॉन्सिबिलिटी (ईपीआर) म्हणजेच विस्तारित उत्पादक जबाबदारीअंतर्गत उत्पादकांना प्लॅस्टिकच्या संपूर्ण उत्पादनचक्राची जबाबदारी घेण्यास भाग पाडले.२०१६ पासून आत्तापर्यंतच्या अधिसूचनांमध्ये पुनर्चक्रीकरण न करता येण्यासारख्या प्लॅस्टिकची व्याख्या अस्पष्ट ठेवण्यात आली. गुटखा-पान मसाला यांच्या पॅकेजिंगला जैवविघटनशील प्लॅस्टिक असल्यास सूट असाही एक नियम करण्यात आला. आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. ती म्हणजे, त्यातील असंघटित कचरावेचकांच्या पुनर्चक्रीकरण क्षेत्राचा अनुल्लेख! अनेक वर्षांपासून शोषित व सामाजिक उतरंडीच्या सर्वात तळाशी असलेले, मानवजातीच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावत असलेली माणसे कचरावेचक म्हणून काम करताना पुनर्चक्रीकरणाच्या साखळीमध्ये सर्वात खाली येतात. ही दुर्दैवी गोष्ट आहे. पिढ्यानपिढ्या अत्यल्प मोबदला, असुरक्षित परिस्थितीत, घाणीत हात घालून काम करत असलेल्या, नफेखोर कंपन्यांमुळे झालेल्या कचरा प्रदूषणावर काम करणाऱ्या या मूक पर्यावरणनायिका व नायकांचा ईपीआर मध्ये समावेश नसणे, ही बाब वेदनादायी होती. कचरावेचकांच्या कामामुळे उत्पादकांचा नवीन उत्पादन माल, ऊर्जा, पाणी, हवा, जमीन, संसाधने यांवरचा खर्च वाचतो. उत्पादनप्रक्रियेत उत्पादन व त्याच्या पॅकेजिंगची आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय किंमत लक्षात घेतली जात नाही. उत्पादकांना संपूर्ण उत्पादनचक्रासाठी जबाबदार ठरवणाऱ्या या ईपीआर धोरणामध्ये अखेर कचरावेचकांची भूमिका व महत्त्व ओळखण्यात आले. ग्रामपंचायती व नगरपालिकांना कचरावेचकांचा प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनासाठी सहभाग नोंदवणे गरजेचे ठरवले. प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियमावली मधील नवीन अधिसूचना म्हणूनच स्वागतार्ह आहे.

# जंगली झाडांच्या फुले, बियांपासून आदिवासींना रोजगार

## वस्तुविनिमय पद्धतीने व्यापाऱ्यांकडून खरेदी

**विक्रमगड** : जंगलातील काही झाडांपासून मिळणारी फळे, फुले व बिया येथील आदिवासींना वरदान ठरत आहेत. जंगली रानमेव्याची विक्रीकरून रोजगार उपलब्ध झाला आहे. विशेषतः तालुक्याच्या ठिकाणी व्यापाऱ्यांकडून वस्तुविनिमय पद्धतीने या रानमेव्याची खरेदी होत असून, या माध्यमातून आदिवासींना संसारोपयोगी वस्तू मिळत आहेत. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर जंगल संपत्ती आहे. विक्रमगड, जव्हार, मोखाडा, तलासरी, डहाणू व वाडा हे तालुके आदिवासीबहुल आहेत. तालुक्यातील जंगल भागात राहणारी शेकडो आदिवासी कुटुंबे जंगलातून विविध झाडांपासून मिळणारी फळे, फुले व बी विकून संसार चालवतात.

जंगलातील साग, निलगिरी, अकेशिया, काजू, गुंज, मोह, चिंच, करंज, सीताफळ, डिंक, सागरगोटे, रिठा, बावा इ. जंगली झाडांच्या बिया, तसेच सुकवलेली मोहफुले व तेलबियांची विक्री करून रोजगार मिळवत आहेत. जंगली झाडे व अन्य वनौषधी वनस्पतींच्या बियांना शहरात चांगली मागणी आहे. विक्रमगड, जव्हार, मोखाडा तालुक्याच्या ठिकाणी भरणाऱ्या आठवडा बाजारातही जंगली झाडांची बियाणे, फुले खरेदी करण्यासाठी खास व्यापारी येतात. जंगली वनस्पतींची काही फुले, बिया नाशवंत असल्याने त्यांची योग्य साठवण केली तरच फायदेशीर ठरते, असे व्यापारी भानुशाली यांनी सांगितले.



> जंगलातून गोळा केलेल्या विविध वनस्पतींच्या बिया, फुले यांची खरेदी आदिवासी विकास महामंडळाकडून झाल्यास आदिवासींना अधिक किंमत मिळेल.
> – **घनश्याम आळशी**, माजी चेअरमन, खरेदी-विक्री संघ विक्रमगड

शासनाने जंगली बिया खरेदी करण्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी विक्रेत्याकडून केली जात आहे. बियाणाच्या बदल्यात कांदा, बटाटा आठवडा बाजारात येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून जंगली वनस्पतींचे बियाणे खरेदी केले जाते व त्या बदल्यात व्यापारी मिरची पावडर, डाळी, कांदा, बटाटा, संसारोपयोगी भांडी देतात. येथे कुठल्याही प्रकारचा पैशाचा व्यवहार होत नाही. वस्तूंच्या बदल्यात वस्तूच दिली जाते.

# पथदिव्यांची केबल टाकण्यासाठी रस्त्याचे नुकसान



**बोईसर** : बोईसर-तारापूर औद्योगिक वसाहतीच्या कामात नियोजन नाही. त्यांचा कारभार नियोजनशून्य पद्धतीने सुरू असल्याचे दिसते. काही महिन्यांपूर्वी रस्त्याचे दुपदरीकरण केलेल्या बोईसर-चिल्हार रस्त्यावरील रुपरजत कॉम्प्लेक्ससमोर पथदिव्यांसाठी केबल टाकण्यासाठी खोदकाम करण्यात आले आहे.

त्यामुळे डांबरीकरण झालेल्या रस्त्यांची वाट लागली असून, पुन्हा रस्त्यावर खड्डे तयार होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. औद्योगिक वसाहतीला अवजड मालाची वाहतूक होते. तसेच कामगारांची या रस्त्यावर वर्दळ असते. विशेषतः याच रस्त्यावरून येथील स्थानिक नागरी वसाहतीतील नागरिकांची, तसेच अधिकारी लाइफलाइन रुग्णालयात उपचारासाठी ये-जा करत असतात. तसेच रस्त्यावर शाळा, महाविद्यालये तथा इंजिनिअरिंग कॉलेजेस असल्याने स्कूल बसेसची रहदारी जास्त असते. एमआयडीसीकडून पथदिवे लावण्यात येत आहेत. त्यासाठी रस्त्याच्या मधोमध चऱ्याचे खोदकाम करण्यात येत आहे. संबंधित ठेकेदाराने भूमिगत केबल टाकण्याचे काम सुरू केले आहे. खोदकामामुळे डांबरीकरण झालेल्या रस्त्याचे नुकसान होत असून, वाहनचालकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

# 'पाण्याच्या टाकीला जर झाकण लावलं असतं तर...'

**मुंबई**: पाण्याच्या टाकीला जर झाकण लावले असते तर आता माझी दोन्ही मुले माझ्यासोबत असती. मुले कधीच उद्यानात जात नाहीत; मात्र रविवार असल्याने ती गेली. वेळ झाला तरी घरी परतली नाहीत, म्हणून शोधाशोध सुरू केली. शेवटचा पर्याय म्हणून आम्ही उद्यानातील टाकीत त्यांचा शोध घेतला. या टाकीत माझ्या मुलांचे मृतदेह आढळले. उद्यानात काय घडले हे सांगताना आई सोनू कवेठिया यांच्या अश्रूंचा बांध फुटत होता.

यापूर्वी या झोपडपट्ट्या हटवल्या होत्या. त्यातील अर्धे माहुल गावात पाठवले. मात्र भाडे देण्यासाठी पैसे नसल्यामुळे कवेठिया कुटुंब फूटपाथवर राहतात. कपड्याच्या मोबदल्यात प्लास्टिकची भांडी देण्याचा कवेठिया यांचा व्यवसाय आहे. यात दिवसाला २०० ते ३०० रुपये सुटले की एक वेळच्या जेवणाची सोय होते. सुरक्षारक्षकांची अपुरी संख्या माटुंगा भागातील हे मोठे आणि प्रशस्त उद्यान आहे. उद्यान मोठे असल्यामुळे सुरक्षा रक्षक कमी पडतात. दिवसा चार आणि रात्री दोन सुरक्षारक्षक येथे तैनात असतात. रात्री गर्दुल्यांचा त्रास वाढला आहे. हे तरुण सुरक्षारक्षकांना धमकवतात. उद्यानाच्या सुरक्षाभिंत आणि जाळ्यादेखील तुटलेल्या अवस्थेत आहेत. अनेकदा पाण्याच्या टाकीवरचे लोखंडी झाकणेही गदुर्ले चोरून नेतात, असे रहिवाशांनी सांगितले.



मुले उद्यानात जात नाहीत; मात्र रविवारी दोघेही खेळायला गेली. सीसीटीव्ही फुटेजमध्येही ते दिसत आहेत. उद्यानातील पाण्याच्या टाकीवरचे झाकण नसल्यामुळे त्यांचा जीव गेला. सोनू कवेठिया, मृत मुलांची आई. मुंबईत कुठेही घर उपलब्ध करून देण्याची मागणी आम्ही वार्ड अधिकाऱ्यांकडे केली आहे. कांजी कवेठिया, मृतकांचे काका. मुलांची खेळणी दुसऱ्या बाजूला आहेत. मुलांना येथे येण्याची गरज नव्हती. दुसरीकडे जायला सांगितले, तरी मुले जात नाहीत. आम्हाला गर्दुल्यांचा त्रास आहे. या संदर्भात पोलिस आणि वॉर्ड अधिकाऱ्यांकडेही पत्रव्यवहार केला आहे.. अजयकुमार रावत, सुरक्षारक्षक.ठेकेदारावर या दुर्घटनेप्रकरणी कारवाई व्हायला हवी. निष्काळजीपणामुळे या मुलांचा जीव गेला. मृत बालकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यायला पाहिजे.

# "I just wanted to bat as much as I could and get better every day": Pant ahead of the first clash



**New Delhi** : Rishabh Pant is feeling a range of emotions as he returns to action after nearly 15 months. The wicketkeeper-batsman is all set to don the big gloves and will lead Delhi Capitals in the IPL 2024. Coming back after a painstakingly long rehab following a horrific car crash in December 2022, Pant feels grateful to be back on the 22-yard strip. "Jittery, nervous, excited...all of it, but at the same time, just happy, being able to come back to professional cricket. I'm just looking forward to playing my first game tomorrow," Pant said ahead of his team's first match of the season.

Pant is well aware about the fact that it will take time to get back to his old self and he wants to take one day at a time at the DC's nets. "Every time I take the field, it's a different feeling altogether. I just wanted to bat as much as I could and get better every day. I don't think much ahead, I take one day at a time, and give my 100%," he added while talking about Delhi Capitals' pre-season camp in Visakhapatnam. Ahead of the IPL 2024, Pant wants to keep things

# AAP Protest: Section 144 imposed at DDU marg as stir over Kejriwal's arrest intensifies

**DELHI**

Aam Aadmi Party workers' protest against Delhi Chief Minister Arvind Kejriwal's incarceration, the Delhi police have tightened security in the nation's capital to avert any unrest. DCP Central, M Harshavardhan, emphasising the need to uphold law and order, especially in the area surrounding court premises, said stringent security measures were implemented. "We have ensured strict security measures to avoid any problems with law and order.



The security concerns around the court have also been taken care of. We need to take care of the law and order situation. ITO is a busy junction, where there is a huge inflow of traffic, so to avoid any congestion, security measures have been put in place," DCP Central, M. Harshavardhan told. Furthermore, the police officer stated that security has been strengthened outside the Rouse Avenue court, which could serve as a gathering point for people. "Section 144 has been imposed at the DDU marg, because it is not a designated protest site, because a lot of vital installations and important offices are there," the DCP added. additionally, the Delhi Police have temporarily shut down the ITO metro station and security was also beefed up there in view of AAP protest. The Delhi Metro Rail Corporation, in a post on X (formerly Twitter), wrote, "On the advice of Delhi Police, ITO Metro station will remain closed from 08:00 AM to 06:00 PM today i.e., 22nd March 2024." Section 144 has been imposed outside the Aam Aadmi Party office in Delhi, coinciding with the commotion generated by AAP workers protesting the ED's detention of AAP supremo and Delhi Chief Minister Arvind Kejriwal on Thursday. Several AAP politicians, including Delhi Ministers Saurabh Bharadwaj and Atishi, were held by Delhi police during the party's rally.

# 'हर घर जल' साठी 'हंडामोर्चा'!

## जलजीवन मिशन योजनेच्या चौकशीची मागणी

■ **कसारा** : केंद्र सरकारकडून राबविण्यात येत असलेली 'हर घर जल' योजनेचा शहापूर तालुक्यात बट्ट्याबोळ उडाला आहे.या विरोधात श्रमजीवी संघटनेने शहापूर तालुक्यातील गावपाड्यात १ ते ७ एप्रिल २०२४ पर्यंत ग्रामपंचायत स्तरावर हंडामोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा पाणी पुरवठा विभागाला दिला आहे. प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहचवला यावे.यासाठी ४ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार शहापूर तालुक्यातील प्रत्येक गावात,वाड्या पाड्यात जलजीवन मिशन योजना राबवली जात आहे.तालुक्यात शासनाने कोटयवधी रुपयांची तरतूद केली असतानाही अजूनही घराघरात नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही.याची सर्वस्वी जबाबदारी ग्रामसेवक व पाणी पुरवठा,आरोग्य व स्वच्छता समितीची असल्याचे श्रमजीवी संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

शहापूर तालुक्यातील पाणी पुरवठा व्यवस्था कमकुवत असून उन्हाळ्यात अनेक गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते आणि टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. शहापूर तालुक्यासह इतरत्र देखील पिण्याची पाण्याची गंभीर समस्या असल्याने केंद्र आणि राज्य सरकारच्या समान आर्थिक योगदानातून ही योजना राबवली जात आहे. जिल्हा परिषदस्तरावर शहापूर तालुक्यात सुरू असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या प्रक्रियेतील पहिल्या,दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील कामे अजूनही अर्धवट स्थितीत आहे. कामाची संख्या व योजना पूर्ण करण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार ठेकेदारांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत.

यातील काही 'सुबे'दारांनी पोट ठेकेदार नेमल्याने योजनेचा बऱ्याच ठिकाणी बट्टयाबोळ झाल्याचे उघड झाले आहे. काही ठिकाणी नियमांना फाटा देत योजनेतील पाईप लाईनचे काम करण्यात आले आहे.

**अशा आहेत मागण्या**

- प्रत्येक गावात झालेल्या अपूर्ण कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणे.
- शासनाच्या पैशाचा अपहार होऊ नये म्हणून अपूर्ण कामांची व पहिल्या टप्प्यातील कामे न करता दुसऱ्या टप्प्याचे केलेल्या कामाचे बिल ठेकेदारांना देऊ नये.
- ग्रामपंचायत कार्यालयावर गावातील महिलांनी व नागरिकांनी आयोजित केलेल्या हंडा मोर्चा दरम्यान अधिकारी पाठविण्याची व्यवस्था करावी.

अशा निष्क्रिय कारणांमुळे गावोगावच्या प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहचवण्यात प्रशासन कमी पडले आहे. इतकेच नव्हेतर काही ठिकाणी कामे निकृष्ट दर्जेची करण्यात आली असल्याचे संघटनेने केलेल्या पाहणीत दिसून आले आहे. काही गावांमध्ये पहिल्या टप्प्याचे काम न होता दुसऱ्या टप्प्याचे काम करून ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षात ठेकेदारांना बिलो अदा करण्याची शक्यता श्रमजीवी संघटनेने निवेदनातून वर्तवली आहे.

> "जलजीवन मिशन योजनेच्या कामाची चौकशी करूनच बिले अदा करण्यात येतील.निकृष्ठ कामे होत असतील तर त्या कामाची चौकशी केली जाईल.निकृष्ठ केलेल्या कामांची बिले दिलीच नाहीत,असे एका गावाचे उदाहरण देखील आहे.विचारता न घेता जे ठेकेदार परस्पर निकृष्ठ कामे करतील अशा ठेकेदारांना बिले दिली जाणार नाही.
> – **विकास जाधव**, उपअभियंता,पाणी पुरवठा विभाग–पंचायत समिती शहापूर




# ठाणे तापू लागले

## ३९.३ अंश सेल्सिअस तापमान

■ **ठाणे** : ठाणे शहरातील तापमानात मागील काही दिवसापासून सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे.गुरुवारी हे तापमान ३९ अंश सेल्सिअस अंशाच्या पार गेले होते. उन्हाचा वाढता पारा ही चिंतेची बाब ठरत असून आरोग्य विभागाने काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात गुरुवारी दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी तापमान हे ३९.३अंश सेल्सीअस इतके नोंदवले गेले.तर सर्वात कमी तापमान सकाळी ८ वाजता २६.६ इतके नोंदवले गेले. त्यानंतर तापमानात वाढचं होत गेली. दुपारी दीड ते साडेचार वाजण्याच्या सुमारास सूर्य आग ओकत होता. त्यामुळे अनेकांची पावले थंड पेय पिण्याकडे वळल्याचे दिसत होते. रसवंती गृहात लोक उसाच्या रसाचा आस्वाद घेतांना दिसून आले. या वाढत्या तापमानाने ठाणेकर नागरिकांनी घर आणि कार्यालयातील एसीत बसून थंडगार हवेत राहणाने जास्त पसंत केले. वातवरणातील वाढत्या उन्हाच्या काहीलीमुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.ठाणे शहरातील तापमानाने मार्च महिन्याच्या सुरुवातीला कधी थंडी तर, उष्णता असा वातावरणाचा खेळ सुरु होता. मार्चच्या पहिल्या आठवड्यात तापमान ३५ अंश सेल्सियस पार गेले होते. त्यामुळे सकाळी थंडावा तर, दुपारी कडाक्याची उष्णता यांमुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत असून घामाच्या धारा लागल्या होत्या. परंतु मागील काही दिवसापासून तापमानात पुन्हा बदल झाल्याचे चित्र आहे. आता सकाळ पासून ते अगदी रात्री पर्यंत तापमानाचा पारा हा चढाच असल्याचे चित्र दिसत आहे. त्यात शालेय मुलांच्या परीक्षा सुरु झाल्याने त्यांनाही या उन्हाचा फटका सहन करावा लागत आहे.



## माजिवड्यात कारला ट्रकची धडक

■ **ठाणे** : ठाण्याच्या घोडबंदर रोड वाहिनीवर माजिवडा जंक्शन ब्रीजखाली गुरुवारी पहाटे व्हॅगनर कारला अवजड वाहतूक करणाऱ्या ट्रकने मागून जोरदार धडक दिली. या अपघातानंतर दोन्ही वाहन चालकांमध्ये वाद उफाळल्याने आणि अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरच राहिल्याने वाहतूक कोंडीची परिस्थिती ओढवली. घटनास्थळी शहर वाहतूक पोलिसांनी धाव घेत वाद मिटवला आणि वाहने बाजूला करत वाहतूक कोंडीही सोडवली. ठाण्याच्या घोडबंदर रोडवर गुरुवारी पहाटे घडलेल्या या अपघातात कुणीही जखमी झालेले नाही. मात्र ट्रक चालक आणि कार चालक यांच्यातील भांडणामुळे वाहतुकीचा चक्काजाम झाला होता.शहर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर अपघातग्रस्त वाहनांच्या मालकांनी आपापसात वाद मिटविला.

## शिक्षकांच्या ड्रेस कोडचा आदेश रद्द करा

■ **मुरबाड** : गेल्या आठवड्यात राज्य शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षकांच्या ड्रेस कोडसंदर्भात आदेश पारित केला होता. या ड्रेस कोडबाबत शिक्षकांमध्ये नाराजी पसरली होती. त्यामुळे काढलेला आदेश रद्द करावा. तसेच ड्रेसकोड हा ऐच्छिक करावा,अशी मागणी निवेदनाद्वारे कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे. शासनाने काही दिवसांपूर्वीच शिक्षकांच्या पेहरावाबाबत आदेश काढले होते. जसे विद्यार्थी एकाच पहेरावामध्ये शाळेत येतात. त्याच प्रकारे शिक्षकांना देखील ड्रेसकोड शासनाने निश्चित केला होता. परिणामी शिक्षक वर्गात नाराजी पसरली आहे. त्यामुळे या निर्णयावर विचार करण्याची गरज भासत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शिक्षक हे ज्ञानदानाचे कार्य करतात. त्यामुळे शिक्षकांच्या नावासमोर इंग्रजीत टीआर व मराठीत टी संबोधन लावण्याबद्दल केलेल्या सूचनेचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी स्वागत केले.

# ठाणे कारागृहातील बंदीवानाकरिता ई–ग्रंथालय



■ **ठाणे** : पुस्तके आपल्या मनावर खोलवर परिणाम करतात आणि आपली मनस्थिती सुधारण्यासाठी मदत करतात. पुस्तके ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त ठरतात. जीवनात चांगले करण्याची प्रेरणा देतात व व्यक्तीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणतात. याच उदात्त हेतुने शिक्षा भोगणाऱ्या बंदीवानांसाठी ठाणे कारागृहात ई-ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. तूर्तास २० संगणकामध्ये विविध भाषेतील ९५० पुस्तके कैद्यांना वाचण्यासाठी उपलब्ध केली असून भविष्यात ५ हजार पर्यंत पुस्तके उपलब्ध करण्यात येणार असल्याचे कारागृह अधिक्षक राणी भोसले यांनी सांगितले. ठाणे मध्यवर्ती कारागृह ऐतिहासिक कारागृहापैकी एक असुन या कारागृहात आजघडीला क्षमेतेपेक्षा दुप्पट बंदिवान आहेत. यात जन्मठेपे पासुन किरकोळ गुन्ह्यांची शिक्षा भोगणाऱ्यांचा समावेश आहे. तसेच महिला बंदी आणि कच्चे बंदी त्याचबरोबर तृतीयपंथी बंद्यांचा सुध्दा समावेश आहे. कारागृहात चांगल्या गुणांची जोपासना होण्यासाठी बंद्यांना पारंपारीक ग्रंथालयाच्या माध्यमातून मराठी, हिंदी,इंग्रजी,उर्दु गुजराती इत्यादी भाषेतील कथा, कादंबरी, मनोरंजन, ऐतिहासिक, तत्वज्ञान, कायदेविषयक अशा विषयांची ई पुस्तके सध्यस्थितीत ठाणे मध्यवर्ती कारागृ परंतु, काळानुरुप भौतिक साधनामध्ये मध्ये आधुनिक तंत्राज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात क्रांती झालेली आहे.त्याच प्रमाणे ग्रंथालय देखील आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोडीने ई-ग्रंथालय झालेली असून ई- ग्रंथालयाच्या माध्यमातून जास्तीत जास्त पुस्तके वाचकांना उपलब्ध होत आहेत.या तंत्राज्ञानाची कारागृहातील बंद्यांना देखील लाभ होऊन बंद्यांना जास्तीत जास्त पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञानसाठा उपलब्ध व्हावा या हेतूने अप्पर महासंचालक, कारागृह महानिरिक्षक अमिताभ गुप्ता यांच्या संकल्पनेतून कारागृहातील बंद्यांना ई- ग्रंथालयाच्या माध्यमातून पी.डी.एफ.स्वरुपातील पुस्तके उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

# पर्यावरणपूरक होळी साजरी करून शहराला हरित बनवू या

## आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड़ यांचे आवाहन

■ **कल्याण** : होळी आणि धुलीवंदन हे सण मोठया प्रमाणात सर्वत्र साजरे केले जातात. यंदाही प्रदूषणमुक्त व पर्यावरणपुरक सण साजरे करून आपल्या शहराला हरित बनवू या तसेच पर्यावरणाचे संवर्धन करूया असे आवाहन पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड़ यांनी केले आहे. प्रदूषणमुक्त होळी साजरी करण्यासाठी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.येत्या दि. २४, २५ मार्च रोजी होळी व धुलीवंदन सण साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रदुषणमुक्त होळी साजरी करण्यासाठी पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड़ यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.



पर्यावरणपूरक होळी साजरी करताना नागरिकांनी होळीच्या लाकडांसाठी वृक्षतोड न करता शेणापासून तयार केलेले गोकाष्ठ लाकडे व गोवऱ्या किंवा ओल्या कचऱ्यापासून बनवण्यात आलेले बायोमास ब्रिकेट किंवा पेलेट यांचा होळीत दहनासाठी वापर करावा. त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक धूलिवंदन साजरे करण्यासाठी नागरिकांनी नैसर्गिक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक होळी व धूलिवंदन साजरे करावे. कारण रासायनिक रंगांचा वापर केल्याने श्वसनाचा त्रास, खोकला आणि कमी ऑक्सिजनची पातळी, त्वचेवर खाज सुटणे, लाल पुरळ उठणे, जळजळ होणे अशी लक्षणे दिसू शकतात.असेही त्यांनी यावेळी सांगितले. पर्यावरण रक्षणासाठी सिंगल युज प्लॅस्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी प्लॅस्टिक पिशवीच्या फुग्यांचा वापर कोणत्याही प्रकारे करू नये. त्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्लॅस्टिक पिशवीच्या फुग्यांचा वापर केल्यास, संबंधित व्यक्ती अथवा व्यक्तीसमूहावर प्रचलित कायदे व नियमानुसार कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देशही पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाचे उपायुक्त अतुल पाटील व कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी दिले आहे.

# उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विकासकामांचा घेतला आढावा

■ **उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मार्फत सुरू असलेल्या ७ रस्त्यांच्या विकास कामाबाबत उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त अजिज शेख यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहामध्ये आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीत अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता अर्जुन कोरगांवकर, अधिक्षक अभियंता धाबे, सहा. संचालक नगररचना ललित खोब्रागडे, शहर अभियंता संदिप जाधव, कार्यकारी अभियंता पी. व्ही. बुडगे, व हनुमान खरात तसेच संबधित कामांचे कंत्राटदार व सल्लागार उपस्थित होते.



उल्हासनगर शहरामध्ये सुरू असलेल्या ७ रस्त्यांच्या विकास कामे पूर्ण करण्याबाबत गती देण्यासाठी येणाऱ्या अडचणी सर्व संबंधित कंत्राटदार यांच्याकडून ऐकून घेतल्या व त्या मार्गी लावण्यासाठी संबंधित विभागांना सूचना करण्यात आल्या. रस्ता रुंदीकरणात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक ललित खोब्रागडे यांनी विकास आराखड्याप्रमाणे सीमांकन करून विहित नोटीसा प्रभाग अधिकारी यांनी बजावून लोकांची बाजू ऐकून कार्यवाहीस गती देण्याबाबत यावेळी सुचित केले. रस्त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे येणारे खांब व ट्रान्सफॉर्मर आवश्यक त्या ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत मागील बैठकीत दिलेल्या सुचनाप्रमाणे प्राप्त अहवालाची माहिती घेऊन एमएमआरडीएने याबाबत त्वरित कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या.

रस्त्यात येणाऱ्या झाडांच्या बाबतीत विहित प्रक्रियेने झाडांचे स्थलांतर करून झाडे जगवण्यासाठी कारवाई करण्याची उद्यान विभागास सूचना केली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

मलनिस्सारण योजनेची कामे व रस्त्यांची कामे परस्पर समन्वयाने मार्गी लागण्यासाठी दोन्ही कामांचे कंत्राटदार यांचा संयुक्त आढावा घेण्यात आला व त्यास गती देण्यासाठी सुचित केले.विकास कामे सुरू असलेल्या ठिकाणी धुळ उडून प्रदूषण होणार नाही. यासाठी पाणी फवारणी करण्यात यावी व ज्या रस्त्यांचे मलवाहिनी टाकून काम पूर्ण झाले आहे.

# उष्माघात टाळण्यासाठी जि.प शाळांच्या वेळांमध्ये बदल ?

■ **भिवंडी** : उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर कडक उन्हामुळे पक्षु पक्षांनी झाडांची सावली शोधणे सुरू केली आहे.तर मनुष्यप्राणीही नाना तऱ्हेची शक्कल लढवताना दिसून येत आहे.यासह सर्वत्रच शितपेयांची मागणी वाढत आहे.तर अशाच प्रकारे उन्हाचा तडाखा वाढत असल्याने ठाणे जिल्ह्यात श्री स्वामी समर्थ बैठकींसह वरिष्ठांच्या आदेशानुसार जि.प च्या मराठी माध्यमिक शाळांच्या नियोजनात बदल करण्यात आले असल्याचे समजते. समर्थ बैठकींमध्ये महिलांची संख्या जास्त आहे.तर जि.प. शाळांमध्ये लहान मुलांचे प्रमाण अधिक असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.महिला व विद्यार्थ्यांना उष्माघाताचा त्रास होऊन अनुचित प्रकार घडू नये याकरता वेळेत बदल करण्याची खबरदारी घेण्यात आल्याची माहिती समर्थ बैठकीस जाणाऱ्या महिला आणि जि. प शिक्षकांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.यामध्ये समर्थ बैठकांचे नियोजन सकाळी ८ ते १०:३० यावेळेत ठेवण्यात आले आहे.तर जि.प शाळांची वेळ ही सकाळी ७ :३० ते दुपारी १२ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

## ओला चालकाला लुटणाऱ्याला अटक

■ **कल्याण** : बाहेर जाण्याच्या बहाण्याने ओला गाडी बुक करायची आणि निर्जस्थळी गाडी पोहचताच ओला चालकाला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या सराईत चोरट्याला कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. भरत थळे असे या चोरट्याचे नाव आहे. कल्याण आणि आजूबाजूच्या परिसरात काही दिवसांपासून ओला चालकाना लुबाडण्याच्या घटना घडत होत्या. एका व्यक्तीकडून ओला बुक केली जायची, ओला गाडी निर्जनस्थळी घेऊन जायची आणि चालकाला चाकूचा धाक दाखवून लुटण्याचा प्रकार सुरू होता. महात्मा फुले पोलिसांकडे याबाबतची तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिस उपायुक्त सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास करत होते. भिवंडी तालुक्यातील लोणार गावात राहणारा भरत थळे हा सराईत चोरटा काही कामानिमित्त वल्लीपीर परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय रुग्णसंख्येत वाढ

## ५०० बेडच्या रुग्णालयात ४६८ रुग्णांवर उपचार सुरू तर केवळ ३२ बेड रिक्त!

■ **ठाणे** : ठाणे महापालिकेच्या मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रतिदिन १५०० ची असलेली ओपीडी २२०० पर्यंत गेली आहे. ५०० बेडच्या रुग्णालयात सद्यस्थितीत ४६८ रुग्णांवर उपचार सुरु असून केवळ ३२ शिल्लक आहे.




कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या खिडकीवर गुरुवारी २ हजार २०० रुग्ण ओपडीवर उपचारासाठी आले होते. तर याच दिवशी ५०० पैकी ४६८ बेड फुल्ल झाल्याचे दिसून आले आहे. तर सध्या रोजच्या रोज १०० ते १२५ रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.त्यामुळे रुग्णालयाचा ताण पुन्हा वाढत असल्याचे चित्र आहे.त्यामुळे आता वाढीव खिडक्या देखील कमी पडत असल्याचे दिसून येत आहे.परंतू येथे येणाऱ्या रुग्णांना आता केसपेपर व इतर तपासण्यासांठी पैसे द्यावे लागत नसल्याने देखील रुग्णालयाचा ताण वाढत असल्याचे चित्र आहे. याशिवाय जिल्हा शासकीय रुग्णालय हे मध्यवर्ती भागातून दूर गेल्याने त्याचा परिणाम देखील कळवा रुग्णालयावर होतांना दिसत आहे.कळवा रुग्णालयावर वाढत असलेल्या रुग्णांचा आकडा पाहता, पुन्हा मृत्यू तांडव होऊ नये या दृष्टीने रुग्णालय प्रशासन काळजी घेत आहे. त्यामुळे पाच पेक्षा अधिक मृत्यू झाले तर ते मृत्यू कशामुळे होतात याचा आढावा रोजच्या रोज घेतला जात असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.ठाणे महापालिकेच्या या रुग्णालयात ठाण्यासह मुंब्रा, दिवा, दिघा, नवीमुंबई आदींसह जिल्ह्याच्या विविध भागात रुग्ण उपचारासाठी येत असतात. याठिकाणी ५०० ची बेड क्षमता आहे.

परंतू मधल्या काळात या रुग्णालायवरील ताण अधिकच वाढल्याचे दिसून आले होते. रुग्णांना उपचारासाठी बेडसुध्दा उपलब्ध नव्हते. अशातच १३ ऑगस्ट २०२३ रोजी या रुग्णालयात एकाच वेळी तब्बल १८ रुग्णांचा मृत्यू झाला. त्यानंतर हे रुग्णालय पुन्हा एकदा चर्चेत आल्याचे दिसून होते. परंतू आता येथील खिडक्या देखील वाढविण्यात आल्या.

## मोरोशी प्राथमिक आरोग्य केंद्रात अनागोंदी

■ **मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोशी येथे सह्याद्री आदिवासी समाज संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी भेट दिली असता दवाखान्यातील भोंगळ कारभार दिसून आला.या कारभराची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार त्यांनी केली आहे. या दवाखान्यात ६ डॉक्टर असून सुद्धा वेळेवर एकही नसतो. त्यामुळे आदिवासी समाजातील नागरिकांची आरोग्या विषयी फार मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, असे आदिवासी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ खाकर यांनी लेखी तक्रारीत म्हटले आहे. मानव विकास निधीचा गैरवापर केला जात आहे. निधी किती येतो व खर्च किती होतो याची काही माहिती मिळत नाही.काही डॉक्टर कामावर हजर नसताना सुद्धा पगार काढला जातो.

## अडकलेल्या मांजराची झाली सुटका

■ **ठाणे** : ठाण्याच्या सिव्हिल हॉस्पिटलजवळ पिंपळपाडा येथील वर्धमान टॉवरच्या दुसऱ्या मजल्यावर अडकलेल्या मांजराची आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने गुरुवारी पहाटे सुखरूप सुटका केली. सिव्हिल हॉस्पिटल जवळील वर्धमान टॉवरच्या दुसऱ्या मजल्याच्या सज्जावर एक मांजर अडकली असल्याची माहिती ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाला मिळाली होती. घटनास्थळी धाव घेत आपत्ती व्यवस्थापन कक्षातील कर्माचाऱ्यांनी सज्जावर अडकलेल्या मांजराची सुखरूप सुटका केली.

## कल्याणमधील वालधुनी भागातील वाहन कोंडीने प्रवासी हैराण

■ **कल्याण** : कल्याण मधील वालधुनी उड्डाण पूल भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या रस्ते कामामुळे वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी हैराण आहेत. सकाळच्या वेळेत कल्याण रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या आणि संध्याकाळी कामावरून परतणाऱ्या प्रवाशांचे यामध्ये सर्वाधिक हाल होत आहेत. कल्याण शहर पूर्व आणि पश्चिम, उल्हासनगर, विठ्ठलवाडी जोडणारा हा रस्ता आहे. या रस्त्यावरून एका वेळी अवजड, बस, रिक्षा, मोटार, दुचाकी अशी वाहने धावतात. शाळेच्या बसचा हाच मार्ग आहे.

म्हारळ, वरप, कांबा भागातील बहुतांशी बस याच रस्त्यावरून येजा करतात. कल्याण पूर्व, पश्चिम भागात होणारी वाहतूक याच रस्त्याने होते.

# पोलिस पाटलांचे मुंबई ठाण्यात स्थलांतर

## गावची कायदा सुव्यवस्था वाऱ्यावर

■ **मुरबाड** । तालुक्यातील 207 गावातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि अवैध प्रकारांवर नजर ठेवण्यासाठी शासनाने प्रत्येक गावात पोलीस पाटलांची सुमारे सात ते दहा हजार मानधनावर नियुक्ती केली आहे. या पोलीस पाटलांना दरमहा गावातील कायदा सुव्यवस्थेचा आढावा स्थानिक पोलीस स्टेशनला देणे सक्तीचे असले तरी अनेक पोलीस पाटील हे स्थानिक ठिकाणी वास्तव्य न करता ते मुंबई ठाणे आदी शहरी भागात वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील कायदा सुव्यवस्था वाऱ्यावर असल्यासारखी स्थिती आहे. ग्रामीण भागातील पोलिस पाटील हे पद नागरिक आणि पोलीस स्टेशन यातील दुवा समजले जाते. त्यांच्यावर गावातील कायदा सुव्यवस्थेची महत्वाची जबाबदारी असते. गावात कोणत्याही प्रकारचा वादविवाद निर्माण झाला तर तो जेणेकरून तेथेच मिटविला जावा, तसेच गावातील बेकायदा उद्योग नियंत्रणात रहावे यात पोलीस पाटील महत्वाची भूमिका बजावतात. सरकारकडून पोलीस पाटलांना सन्मानासोबतच मानधन मिळते. मात्र मुरबाड तालुक्यातील सुमारे 207 गावात पोलीस पाटील कार्यरत असले तरी अनेक पोलीस पाटील हे स्थानिक ठिकाणी वास्तव्य न करता ते मुंबई ठाण्यासारख्या शहरी भागात वास्तव्य करत आहेत. यातील काही शासकीय नोकरी देखील करतात. त्यामुळे ग्रामीण भागात गावठी, देशी मद्य, ताडी, गुटखा, जुगार आदी अवैध धंद्यांना सुगीचे दिवस आले आहेत. तसेच सध्या तरुण पिढीला क्रिकेट आणि बैलगाडा शैर्यतीने पछाडले असून त्यातही बेकायदा प्रकार होत आहेत. ग्रामीण भागात काला पिला पाकोळी हे जुगार सुरू आहेत. यातून पैशांसाठी गुन्हेगारी वाढत आहे. त्यामुळे पोलीस पाटील यांनी संबंधित गावातच राहावे त्यासाठी मानधन वाढवण्याची मागणीसोबत संबंधित यंत्रणेने लक्ष देण्याची गरज आहे. गावचे पोलीस पाटील गावात वास्तव्य न करता शासनाचे मानधन घेत असतील तर ही गंभीर बाब आहे.त्याची चौकशी केली जाईल. पोलीस पाटलांना गावातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासन मानधन देते.